Impact Factor-8.575 (SJIF) ISSN-2278-9308


# B.Aadhar

## Single Blind Peer-Reviewed & Refreed Indexed

## Multidisciplinary International Research Journal

FEBRUARY 2023
(CCCLXXXVIII ) 388 (C)

### ENVIRONMENT : ISSUES, CHALLENGES AND SUSTAINABLE DEVELOPMENT



**Chief Editor**
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Editor**
Dr.Dhale S.U.
Head Department of Political Sci.
Shivaji College, Hingoli
Tq.Dist.Hingoli (MS)

**This Journal is indexed in :**
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

SHIVAJI COLLEGE HINGOLI
PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI

For Details Visit To : www.aadharsocial.com
Aadhar Publications

| | | |
|---|---|---|
| 21 | पर्यावरणाचा ऱ्हास आणि शाश्वत विकास डॉ.रेखा बालाजीराव पाटील | 75 |
| 22 | भारतातील कृषी क्षेत्रावरील हवामान बदलाचा परिणाम प्रा. डॉ.शिवाजी पाते | 80 |
| 23 | पर्यावरणीय अर्थशास्त्र आणि शाश्वत विकासतील अडथळे प्रा. देविदास गोकुळ गवळी | 84 |
| 24 | हवामानबदलाचे महाराष्ट्रातील शेतीवरील परिणाम एक अभ्यास प्रा. डॉ. रेणुकादास यशवंत बोनर | 87 |
| 25 | वाढता विकास आणि पर्यावरणाचा असमतोल प्रा. डॉ. रामदास धो.मुकटे | 93 |
| 26 | महाराष्ट्रातील पर्यावरण विषयक चळवळी डॉ. रामभाउ भाकरे | 96 |
| 27 | शाश्वत विकास संकल्पना व स्वरुप प्रा.डॉ. मदन लक्ष्मण शेळके | 100 |
| 28 | पर्यावरण संवर्धन आणि मानवी हक्काचे रक्षण एक समाजशास्त्रीय अध्ययन दलित सुभाषराव कांबळे , प्रा. डॉ. दीपक सु.धारवाडकर | 104 |
| 29 | ग्रामीण साहित्यातील निसर्गदर्शन प्रा डॉ श्रीराम मारोतराव कऱ्हाळे | 110 |
| 30 | पर्यावरण अभ्यास काळाची गरज प्रा. डॉ. व्यंकटेश काळुराम मदनुरे | 114 |
| 31 | खेळाच्या माध्यमातून शाश्वत पर्यावरणाचा प्रचार- प्रसार आणि पर्यावरण संतुलन - एक अभ्यास प्रा. डॉ.गुणाजी पांडुरंग नलगे | 117 |
| 32 | मराठी साहित्यातून आलेले पर्यावरण भान प्रा.डॉ. संगीता मुंढे | 120 |
| 33 | रंगनाथ पठारे यांच्या कथेतील व्यक्तिरेखांचे चित्रण प्राचार्य डॉ.नागनाथ पाटील ,केशव विठ्ठल कोकाटे | 124 |
| 34 | नैसर्गिक संसाधनांचे व्यवस्थापन व नैसर्गिक संसाधनांवर होणाऱ्या परिणामांचे अध्ययन करणे. कु. अश्विनी रोहिदास भोईर, | 128 |


PRINCIPAL
Shivaji College, HINGO

**B.Aadhar'** Peer-Reviewed & Refereed Indexed Multidisciplinary International Research Journal
Impact Factor -(SJIF) -8.575, Issue NO, (CCCLXXXVIII) 388- C
ISSN : 2278-9308 February, 2023

# ग्रामीण साहित्यातील निसर्गदर्शन

प्रा डॉ श्रीराम मारोतराव कऱ्हाळे
मराठी विभाग प्रमुख    शिवाजी महाविद्यालय हिंगोली
मो.नं.9890579227

साहित्य हा समाजाचा आरसा असतो. समाजामध्ये घडणाऱ्या प्रत्येक घटना प्रसंगाची नोंदच साहित्य घेत असते. साहित्याचा निर्माता हा समाजाचा एक घटक असतो. समाजात वावरत असल्याकारणाने त्यांच्या भोवती घडणाऱ्या घटना प्रसंगांना शब्दातून साकार करण्याचे कार्य तो करीत असतो. ज्या समूहात वावरत असतो त्या समुदायाची सामाजिक सांस्कृतिक धार्मिक ऐतिहासिक आर्थिक भौगोलिक व नैसर्गिक परिस्थिती अतिशय जवळून बघत असतो. त्यामुळे त्यांच्या साहित्यात या सर्वच घटकांचा समावेश असलेला आपणाला दिसून येतो.

ग्रामीण जीवनात वावरणाऱ्या लेखकांनी ग्रामीण साहित्याची वास्तव स्वरूपात निर्मिती केली आहे. ग्रामीण भागातील रुढी, परंपरा, रीती, संस्कृती यातून ग्रामीणत्व सिद्ध होते. ग्रामीण जीवनात शेतीला महत्त्वाचे स्थान आहे म्हणूनच कृषी केंद्रित दृष्टी ठेवून ग्रामीण साहित्य निर्माण होऊ लागले आहे. जमिनी विषयीची आदरयुक्त भावना अंतर्मनात दडलेली दिसते. शेतात पिकणाऱ्या हिरव्या धनाशी त्यांचे उत्कट नाते दिसून येते. ग्रामीण मनाचे सुख-दुखे शेतीनिष्ठ असतात.

लोक जीवनातून लोकसाहित्याची निर्मिती झाली. ग्रामीण साहित्याचे मूळ स्थान लोकसाहित्य आहे. ग्रामीण साहित्यात लोकसंस्कृती लोकमानस त्यांच्यातील रूढी, परंपरा, प्रथा इत्यादीचे चित्रण येते. शेतीशी निगडित समाज ग्रामीण भाषा बोलणारा समाज ग्रामीण भूभागावर व निसर्ग सानिध्यात वास्तविक करणारा समाज लोकजीवनाशी बांधील असलेल्या समाज म्हणजे ग्रामीण समाज किंवा ग्रामीण लोकजीवन म्हणता येईल .ग्रामीण साहित्याबाबत नागनाथ कोत्तापल्ले म्हणतात, "ग्रामीण जीवनातून फुलणारे ग्रामीण वास्तवातून साकार होणारे साहित्य ग्रामीण साहित्य होय."१ ही ग्रामीण साहित्याची केलेली व्याख्या यथार्थ वाटते.

ग्रामीण परंपरेतून,मातीतून, घामातून, कामातून ग्रामीणत्व स्पष्ट होताना आढळते. ग्रामीण माणसे गावात शेतात वस्त्यावर वाड्यामध्ये वास्तव्य करतात. "कुणबी पुढे झाल्या वाचून एकाही खेड्यात वसाहत झाली नाही त्याने धान्य पैदा करून इतरांच्या खाण्याची तरतूद केली तेव्हा ते (बलुतेदार कारू- नारू, फिरस्ते) गोळा झाले. खेडणे म्हणजे जमीन कसणे आणि खेडूत म्हणजे जमीन कसणारा. तेव्हा खेडूताची जी वस्ती ते खेडेगाव."२ असे मत 'गावगाडा' या ग्रंथात त्रि.ना.अत्रे यांनी नोंदवले आहे. कुणबी हा ग्रामीण संस्कृतीचा महत्त्वाचा घटक आहे असे स्पष्ट होते.

ग्रामीण जीवनामध्ये निसर्गाला अन्यनसाधारण महत्त्व आहे. निसर्ग असल्याशिवाय ग्रामीणता दाखवणे कठीण आहे. हा ग्रामीण निसर्गच ग्राम संस्कृतीला आकार देत असतो. निसर्गाचा हिरवा रंग ग्रामीण जीवन समृद्ध करीत असतो. निसर्ग हा मानवाला हिरवे राहण्याचे हिरवे स्वप्न पाहण्याची जणू प्रेरणा देत असतो. तेथील वृत्ती- प्रवृत्तीवर प्रकाश टाकण्याचे व त्या प्रकट करण्याचे सामर्थ्य निसर्गात आहे. ग्रामीण साहित्याच्या प्रारंभापासून निसर्ग जाणीव प्रकट होताना आढळतात.र. बा. दिघे, ग. ल. ठोकळ, लक्ष्मणराव सरदेसाई या पहिल्या पिढीतील ग्रामीण साहित्य लेखकांपासून निसर्ग सामर्थ्य प्रकटलेले आढळते. अर्थात हे जीवन त्यांच्या साहित्यात वरून दिसत असले तरी त्यामुळे त्याला ग्रामीणतेचा स्पर्श होताना आढळतो.

PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI

B.Aadhar' Peer-Reviewed & Refereed Indexed Multidisciplinary International Research Journal
Impact Factor -(SJIF) -8.575, Issue NO, (CCCLXXXVIII) 388- C
ISSN : 2278-9308
February 2023

निसर्ग शेतकऱ्यांचा ग्रामीण मनाचा देव आहे. या देवाला प्रसन्न करण्यासाठी त्याची पूजा केली जाते. काही झाडांना, पशांना, विहीर, तळी, बारव यांना पवित्र व देवांच्या स्थानी मानले जाते. हा निसर्ग मानवाला प्रेरणा देत असतो. या प्रेरणा घेऊन हा ग्रामीण माणूस जगत असतो. लोकसाहित्यात निसर्ग हा एक व्यक्तिमत्त्व घेऊन अवतरताना आढळतो. निसर्गाचा कोप झाला तर संपूर्ण ग्रामव्यवस्था कोलमडून जाते. निसर्गाला देव मानून येथील लोकमानस जगत असते. जनमानसाच्या कृती-उक्तीचा आविष्कार लोकमानसात प्रकटलेला असतो.

निसर्ग कोपला तर जनजीवन विस्कळीत होते म्हणून हा ग्रामीण माणूस निसर्गाला देव मानत आला आहे. ग्रामीण भागात डोंगर-दऱ्या, मंदिरे, झाडे, या सान्निध्यात देवतांची वस्ती दिसून येते. प्राचीन पुराणामध्ये मानव आणि निसर्ग यांचे एकरूपत्वस्पष्ट केलेले दिसून येते. श्रीकृष्ण ज्या वेळी गोकुळात वास्तव्याला होते त्यावेळी गोप-गोपिकांना गोवर्धनाची पूजा करायला सांगतो. यातून इंद्र रुष्ट होतो. पर्जन्यदेवता रौद्र रूप धारण करते व देव त्यांचा बचाव करतो. या कथेतून निसर्ग आणि मानव यांच्यातील अद्वैत स्पष्ट होते. एखाद्या वृक्षाखाली देवतांचा वास असतो यातूनही निसर्गाविषयी भावना प्रकट होताना आढळते. ग्रामीण संस्कृती मुळातच भूतदयावादी दिसून येते. जीव-जीवस्य जीवनम् म्हणजे एक जीव दुसऱ्याच्या सहकार्याने जगत असतो. पिंपळ, वड, चिंच, तुळस, पळस, आपटा या सारख्या वृक्षांना देव-देवतांचा धार्मिक संदर्भ प्राप्त झाल्याने त्याची तोड करू नये, त्याला पूजावे ही धार्मिक भावना लोकमानसात रूढ झालेली दिसून येते. कृषिकेंद्रित दृष्टीने जगणारा हा ग्रामीण माणूस निसर्गाच्या सान्निध्यात रमलेला असतो. शेतीचे काम करून थकणारा हा शेतकरी, मजूर या वृक्षाच्या सावलीला विसावलेला असतो. ग्रामीण कादंबरीतून हा निसर्ग व्यक्तिमत्त्वाच्या पातळीवर समोर आलेला आहे. निसर्गाशिवाय ग्रामीण जीवन असू शकत नाही.

या संदर्भात डॉ. विश्वनाथ शिंदे यांनी व्यक्त केले मत यथार्थ वाटते.ते म्हणतात, "ग्रामीण संस्कृती निसर्गसन्मुख असते. तेथील माणसाचे जगणे निसर्गाशी बांधलेले असते. निसर्गाच्या लहरीपणाचा परिणाम ग्रामसंस्कृतीवरहोत असतो; त्यामुळे निसर्गाविषयीची भीती त्याच्या मनात असते. परावलंबी जगण्यामुळे खेड्यातला माणूस दैववादी झालेला असतो. आदिमतेच्या काही खाणाखुणा ग्रामीण जीवनात दिसतात."३ वरील विवेचनावरून लक्षात येते की, निसर्ग हा ग्रामीणतेचा मुख्य भाग आहे. निसर्गाचा मानवी व्यक्तिमत्त्वावर परिणाम होतो. तसेच त्याच्या मानसिकतेवर देखील हा प्रभाव जाणवत असतो. कधी ओला दुष्काळ तर कधी कोरडा दुष्काळ यानुसार तेथील लोकमानस सोशिक व नियतीवादी बनलेले आढळते.
त्यामूळे ही निसर्ग ग्रामीण साहित्यातून येतो.

'धग' या उद्धव शेळके यांच्या कादंबरीमध्ये विदर्भ प्रांतातील तप्त उन्हाळा, दुष्काळ या अनुषंगाने हे लोकजीवन घडलेले आहे. कौतिकच्या दुःखाची कैफियत मांडताना लेखकाने तेथील निसर्गालाही महत्त्वाचे स्थान दिलेले आहे. येथील निसर्गदेखील मानवी मनातील अस्वस्थता प्रकट करताना आढळतो. कष्ट करणाऱ्या कौतिकची मानसिकता प्रकट होत असताना निसर्गचित्र येते. "आता उन्हं चांगली कडकडू लागली होती. तूर शेंग धरू लागली होती. फुलोर झडू लागला होता. त्याचा वास वावरभर घमघमत होता. कडकडत्या उन्हानं पऱ्हाटीची बोंड वाळत होती. तडकत होती. कापूस जमिनीवर झुकला होता. लोमकळत होता. पडत होता. काही आपली जागा सोडून दुसऱ्या खालच्या फांदीवर येऊन लोमकळत होता. हे पाहून आपल्या घराशी खेळणाऱ्या दिवसभर हुंदडणाऱ्या लेकरांचं हुंदडणं कौतिकच्या डोळ्यात भरलं होतं."४ यातील निसर्ग लोकजीवनाला बरेच काही शिकवून जातो असे म्हणावे लागते. येथील लोकांच्या जीवनात नेहमी रखरखता उन्हाळा दिसतो. येथील कपाशी, तूर यांसारखी पिके कधी-कधी निसर्गाच्या लहरीपणाला घाबरत होती, कोमेजत होती. या पिकांप्रमाणे माणसाच्या वृत्ती- प्रवृत्ती यादेखील नियतीवादी झालेल्या आढळून येतात

'गोतावळा' या कादंबरीतील ग्रामीणजीवन प्रकट होत असताना येथील नारबा या पात्राबरोबर निसर्गही जिवंत झालेला दिसून येतो. यातील रामू सोनावडे हा येथे नारबाचा मालक नारबाला चांगला वाटत नसला तरी प्रत्यक्ष सज्जन वृत्ती धारण करणारा आहे. या शेतीवर व निसर्गावर त्याचे निस्सीम प्रेम असलेले दिसते. जमीन ही त्याची काळी आई आहे असे मानणाऱ्या शेतकऱ्याचा तो पाईक असलेला दिसतो. परंतु पुढे कोल्हापूरच्या पाहुण्यांच्या

PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI

सल्ल्याने तो काळ्या आईला, शेतीला दासी बनू पाहतो आहे. म्हणजे आजच्या व्यवहारी जगातील मनुष्य या अंगाने प्रकट होतो. यातील नारबा हा कृषिसंस्कृतीचा प्रतिनिधी आहे. त्याचे व्यक्तिमत्त्व हे निसर्गाचेच एक रूप झालेले आहे. म्हणून तो म्हणतो, "हेऽ हेड करून खच्चून बराडलो. आभाळाचं पिल्लू होऊन त्येच्या पख्खाबुडी जावसं वाटलं. समदं रान टवटवीत बघून मन मोकळं मोकळं झालं. अंतराळी व्हावंसं वाटू लागलं... समद्या माळभर, रानभर, उसावरनं, पिकावरनं तरंगततरंगत फिरून यावं. समदं न्याहाळावं, कुरवाळावं, एकसंघ धरून मिठी मारावी... हे समदं आपलंच. आपल्यातनं उगवलेलं, उगीवतंय उगीवतंय नि भराला आलेल्या बाईगत फुलून येतंय. हाका मारतंय. अंगावर घे म्हणतंय. लोळ म्हणतंय."५ यातील हे लोकमन किती निसर्गाशी एकरूप झालेले आहे. याचे जिवंत चित्रण या ठिकाणी पाहावयास मिळते. मनुष्य हा निसर्गातून आलेला आहे आणि निसर्गातच एकरूप होणार आहे. याची जाणीव नारबा जणू करून देतो आहे. या कृषिजीवनात निसर्ग येणे अपरिहार्य ठरते. येथील देवदेवता या निसर्गाचे रूप घेऊनच समोर येतात. येथे म्हसोबाला नारळ देणे, नैवद्य देणे, कोंबडा कापणे या अंधश्रद्धारूपी रूढी आलेल्या आहेत. त्यातून या देवतेला शेतीचे, निसर्गाचे रक्षण करावे हेच साकडे घातले जाते आहे.

बाबाराव मुसळे यांच्या 'हाल्या हाल्या दुधू दे' या कादंबरीतील लोकजीवनात धार्मिक अंधश्रद्धेबरोबरच ग्रामीण भागातील निसर्गाचे रूपही पाहावयास मिळते. यातील आनसा व न्यानबा ही पात्रे शेतीनिष्ठ जीवन जगत आहेत. निसर्ग कधी भरभरून देतो तर कधी डोळयात पाणी आणतो. यामुळे आसु हासू यांचा संगम येथे दिसूनयेतो. येथे सर्व दुःखच आहे. हे दुःख परिस्थितीने निर्माण केले आहे. येथील लोकजीवन ऋतुमानानुसार बदलते आहे. येथील निसर्ग नियमानुसार लोकमानम आपली जीवनरहाटी चालवते आहे. विदर्भातील उन्हाळा जसा सृष्टीला भाजून काढतो तसेच या न्यानबाच्या संसारालाही येथील परिस्थिती दुःखाचे चटके देताना दिसते आहे. मानवी जीवनातील पर्वताएवढे दुःख ही नियती वाढवून ठेवते हेच जणू न्यानबाच्या बाबतीत चित्र दिसून येते. निसर्गाचे वर्णन येथे लोकमानसाचा ताण वाढवते आहे. "दिवस सरत आला तरी, पाऊस थांबला नाही. बावरात फट्याह्यानं पोटऱ्याइतकालं पाणी वाहू लागलं. पाऊस सुरू झाला तव्हाच कस अंधारून आल्यावाणी झालं व्हतं. धांदलभर अंतरावरचे झाडंझुडप दिसेना. पावसाचे थेंब झाडाच्या पानाच्यवर पडल्यानं जिकडंतिकडं निसता टपटप टपटप आवाज भरला व्हता. त्यात कव्हावव्हा गरजात बी व्हतं. कडकड इजा बी चमकत व्हत्या... काळ्या मातीत तिचे पाय पोटऱ्यालोकं चिखलात रुतत व्हतं."६ या लोकमानसाच्या जीवनात संकटाची मालिका पिच्छा सोडत नाही. हा निसर्गदेखीलनियतीला साथ देतो आहे. तळागाळातील या शेतकरी समाजाचे दारिद्र्य, दुःख त्याला तळाला नेऊन पोहचविते. हा शेतकरी नुसता तळात नाही तर तो गाळातही आहे. एक पाय त्याने वर काढला तर दुसरा पाय परत गाळात जाती आहे. ही परिस्थिती त्याला जणू वर येऊ देण्यास तयार नाही. याचेही दुःख या लोकमानसाला आहे असे म्हणता येते.

'जैत रे जैत' या कादंबरीतील नाग्या व चिंधी ही पात्रे निसर्गाच्या सान्निध्यात जगणारी मानवरूपी पाखरे आहेत. त्यांना या निसर्गाची पाखर आहे. या निसर्गातच देवत्व शोधण्याची लोकमानसाची दृष्टी यातून प्रकट होते. देवीमाशीने त्याच्या अंगाचा चावा घेतल्यावर त्याचे मन घाबरे होते. याचे वर्णन करताना तो म्हणतो, "पण शरीरापेक्षा अधिक दुखे त्याचे मन. तो म्हणे कसं झालं हे? आपण महादेवाला नमस्कार केला होता. झाडदेवाचं काही ठेवलं नव्हतं. देवमाशीच्या तर चार-सहा वेळा पाया पडलो होतो. तिला सांगितलं होतं. बजावलं होतं. का देवमाशी, पाया पडलो आहे. कान धरले आहेत. तुझ्या परजेला हुकूम दे, डंख करू देऊ नकोस, डासे काढून देऊ नकोस. अन् मग माशाकाय म्हणून चावल्या?"७ हे ग्रामीणमन निसर्गावर प्रेम करणारे असल्याने त्याला त्याचा मोठा आधार वाटतो. यामध्ये देवीमाशी, वृक्षराजी ही त्याची दैवते आहेत. या निसर्गरूपी देवाच्या हुकुमाने सर्व जीवनव्यवहार पार पडत असतात. अशी येथील लोकश्रद्धा दिसून येते. ठाकर आदिवासी लोकजीवनात रूढी, परंपरा यांच्या इतकेच निसर्गाला महत्त्वाचे स्थान दिसून येते.

शंकर पाटील यांच्या 'टारफुला' कादंबरीमध्ये गावातील रूढी, परंपरा यांच्याबरोबर गावातील वृत्ती-प्रवृत्ती समोर येतात. या कादंबरीचे शीर्षकच मुळात निसर्गातून आलेले आहे. कृषिजीवनातील शेतकरी शेतातील सत्र काढत

PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI

असतो. त्यामुळे पिकाला जोम येतो. टारफुला म्हणजे गावातील खलप्रवृत्तीरूपी तण आहे असे म्हणता येते. यातील निसर्ग हा खेड्याची देहबोली घेऊनच अवतरलेला आहे. कृषिची कामे करताना हा निसर्ग शेताचे शिवाराचे रूप घेऊन अवतरताना आढळतो. सुगीचे दिवस सुरू होताना शेतीच्या कामाची चाललेली धांदल येथे प्रकट होते. त्याचे वर्णन येथे येते, "आणि एकाएकी जोंधळ्याच्या कापण्या सुरू झाल्या. शेंगाच्या बावरात कुदळी दिसू लागल्या. वर्षभर सांदी कोपऱ्याला पडलेले विळे लोहाराच्या घरी जाऊन पाणी पिऊन येऊ लागले. गडी जोंधळा कापायला जाऊ लागले. बायका शेंगा वेचायला पळू लागल्या. दिवस दिवसभर घरांना कुलप पडू लागली. शाळाही ओस पडल्यागत झाली. हे दिवस पुन्हा वर्षभर दिसणार हे से होते ! सारं गाव त्यात गढून गेलं, बायका-पोरं, म्हातारी कोतारी साऱ्यांच्याच लोक मागे सुगी लागली. "८ येथे प्रदेशातील पीके, शेतासाठी लागणारी अवजारे यांचा उल्लेख येऊन जातो. हे जनजीवन कृषिजीवनाशी बांधलेले दिसते. निसर्ग हा लोकजीवनाचा अविभाज्य भाग आहे.

निष्कर्ष:-

'निसर्गाच्या सानिध्यात वसलेला समुदाय, त्याच भूप्रदेशातील बोलीभाषा, चाली, रीती, रुढी, परंपरा, माणसाच्या वृत्ती- प्रवृत्ती, समाज जीवन, धार्मिक जीवन, संस्कृती दर्शन, भौगोलिक परिसर, निसर्ग या सर्व घटकांचे वर्णन ज्या साहित्यातून येते त्या साहित्याला ग्रामीण साहित्याचे म्हणतात.'

ग्रामीण भागातील लोकांवर निसर्गाच्या बदलाचा परिणाम पडत असतो. ग्रामीण समुदायाला निसर्गाने साथ दिली तर त्यांचे जीवन आर्थिक दृष्ट्या समृद्ध होते. पाऊस न झाल्यास शेती पिकत नाही त्यामुळे ग्रामीण समुदायाच्या जीवनात अनेक समस्या निर्माण होतात त्या समस्यांना तोंड देत त्यांना जगावे लागते.

ग्रामीण जीवनात निसर्ग हा मुख्य घटक आहे म्हणून साहित्य लिहित असताना तो घटक वेगळा करून साहित्य लिहिणे अशक्यप्राय असते. मासे आणि पाणी हे जसे वेगळे राहू शकत नाही तसा ग्रामीण जीवन आणि निसर्ग हे वेगळे राहू शकत नाही.

एकंदरीत ग्रामीण साहित्यातून निसर्गाचे चित्र आलेलेच असते नदी, डोंगर, दरी- खोरे,टेकड्या, जंगल, झाडी यामध्ये वावरत असताना अनेक संदर्भ साहित्यातील नायक खलनायकाच्या जीवनात आलेले साहित्यातून आपल्याला दिसतात.

संदर्भ टिपा,

१) 'ग्रामीण साहित्य स्वरूप आणि शोध' कोत्तापल्ले नागनाथ, मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे,१९८५,पृ.७
२) 'गावगाडा' , अत्रे त्रि.ना.वरदा बुक,आ.तिसरी १९८९पृ.७
३) ग्रामीण साहित्य आणि वास्तव, इंगोले कृष्णा (संपा.), स्नेहवर्धन, २०११ पृ. २४०.
४)'धग', उद्धव शेळके, पॉप्युलर प्रकाशन १९६० पृ.२४-२५
५) 'गोतावळा',आनंद यादव ,मौज प्रकाशन १९७१ पृ. ९२
६) 'हाल्या हाल्या दूधू दे,' बाबाराव मुसळे ,बजाज प्रकाशन १९८५ पृ.९०
७) 'जैत रे जैत ' गो.नी.दांडेकर, कॉन्टिनेंटल प्रकाशन, १९६५ पृ.७६
८) ' टारफुला', शंकर पाटील, मेहता प्रकाशन १९६४ पृ.११०

PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI